माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/E/००००१९

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सहायक (गुन्हे) (अति.कार्यभार)**
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.१०.२०२३ | - | १४.११.२०२३ | २९.१२.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये दिशाभुल करणारी व चुकीची माहिती दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.२९.१२.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १२.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पोलीस महासंचालक, मुंबई यांना उद्देशुन पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही म्हणून अपिलार्थीनी दि. १४.११.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१२.२०२३ रोजी प्रथम अपील आदेशात पुढीलप्रमाणे नमुद केले- अपिलार्थी श्री. पंचप्पा म्हाळप्पा काळे, सोलापूर यांनी त्यांच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केलेल्या दि. १२.१०.२०२३ च्या ऑनलाईन अर्जास अनुसरुन त्यांना या कार्यालयाच्या दि. २९.११.२०२३ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. परंतु अपिलार्थी यांच्या दि. ०२.०२.२०२१ च्या ईमेल तक्रार अर्जाबाबतची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी दि. १६.११.२०२३ रोजी ऑनलाईन

..२/-

प्रथम अपिल अर्ज सादर केला आहे. अपिलार्थी श्री. काळे यांचा दि. ०२.०२.२०२१ चा ईमेल दि.१५.०२.२०२३ रोजी ईमेल द्वारे आवश्यक त्या कार्यवाहीकरीता पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या कार्यालयात पाठविण्यात आला आहे. अपिलाथर्थी हे दोन्ही वेळेस सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याने त्यांचे म्हणणे समजले नाही. तथापि, त्यांचा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांनी पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीशी मी सहमत आहे. त्यामुळे अपिलार्थी श्री.पंचप्पा म्हाळण्या काळे, सोलापूर यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त दि. १३.१०.२०२३ चा ऑनलाईन प्रथम अपिल अर्ज याद्वारे निकाली काढण्यात येत आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असुनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०१.०७.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत दि.१२.१०.२०२३ रोजी ऑनलाईन केलेला अर्ज पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे क्र. ११९२/सपोआ/समन्वय माहिती/२०२३, दि. १३.१०.२०२३ अन्वये पाठविण्यात अलेले पत्र या कार्यालयास दि. १७.१०.२०२३ रोजी व जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांना ई ऑफीस प्रणालीव्दारे दि. १८.१०.२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत केलेल्या दि. १२.१०.२०२३ रोजीच्या ऑनलाईन अर्जात नमूद केलेला दि. ०२.०२.२०२१ रोजीचा ई-मेल या कार्यासनात दि. ०३.०२.२०२१ रोजी प्राप्त झाला असून, सदरचा ई-मेल अर्ज पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने सदरचा ई-मेल व्दारे पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता दि.१५.०२.२०२१ रोजी ई-मेल व्दारे पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या कार्यालयात पाठविण्यात आला आहे. याकरिता अर्जदार श्री. पंचप्पा काळे यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत दि. १२.१०.२०२३ रोजीचा ऑनलाईन केलेला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) (दोन) मधील तरतुदीनुसार आयुक्त, सोलापूर शहर यांचे यांचेकडे पाठविण्यात येत असलेबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/२५/६९/माअ (श्री.काळे)/५८८/२०२३, दि. २३.१०.२०२३ चे अन्वये अर्जदार श्री. पंचप्पा काळे यांना कळविण्यात आले आहे. सदर माहितीने समाधान न झाल्याने अर्जदार श्री. पंचप्पा काळे, सोलापूर शहर यांनी दि. १६.११.२०२३ अन्वये ई-मेल व्दारे केलेला प्रथम अपिल अर्ज या कार्यालयास दि. १६.११.२०२३ रोजी व या कार्यासनास दि. २८.११.२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अपिल अर्जास अनुसरून अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांना या कार्यालयाचे क्र.पोमसं/२५/६९/माअ (श्री. काळे)/५८८/२०२३, दि. ३०.११.२०२३ चे ज्ञापान्वये दि. १३.१२.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे) यांचे दालनात सुनावणीकरिता उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच पुनः क्र.पोमसं/२५/६९/माअ (श्री काळे)/५८८/२०२३, दि. १४.१२.२०२३ चे ज्ञापान्वये दि. २८.१२.२०२३ रोजी दुपारी ०३.३० वा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे) यांचे दालनात सुनावणी करिता

..३/-

उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे हे दोन्ही वेळेस सुनावणीकरिता उपस्थित राहीले नाहीत अथवा अनुपस्थितीबाबत या कार्यालयास काहीही कळविले नाही. तथापी अर्जदार यांचा ई-मेल अर्ज जन माहिती अधिकारी यांनी पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या महितीशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे) सहमत असल्याने, श्री. पंचप्पा काळे यांचे ई-मेल व्दारे या कार्यालयास प्राप्त दि. १६.११.२०२३ रोजीचा प्रथम अपिल अर्ज निकाली काढल्याबाबत या कार्यालयाचे समक्रमांकीत दि. २९.१२.२०२३ चे पत्रान्वये अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांना कळविण्यात आले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

State Information Commission Greater Mumbai